| **Headline:** NSE announces rebranding of all indices | |
|---|---|
| **Source:** Maharashtra Times | **Date:** 11 November 2015 |

# 'एनएसई'च्या निर्देशांकांचे 'रिब्रँडिंग'

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

धनत्रयोदशीचे औचित्य साधत राष्ट्रीय शेअर बाजाराने (एनएसई) आपल्या सर्व निर्देशांकांचे रिब्रँडिंग केले. त्यामुळे एनएसईची ओळख असलेला 'सीएनएक्स निफ्टी' निर्देशांक यापुढे 'निफ्टी५०' या नावाने ओळखला जाणार आहे.

एनएसई समूहातील कंपनी असलेल्या इंडिया इंडेक्स सर्व्हिसेस अँड प्रॉडक्ट्स लिमिटेडतर्फे सर्व निर्देशांक पाहिले जातात. या सर्वांचे रिब्रँडिंग करण्यात आले आहे.

**निफ्टीचेही झाले बारसे, निफ्टी५० नवे नाव**

एनएसईची स्थापना ३ नोव्हेंबर १९९५ रोजी झाली. त्यानंतर वीस वर्षांच्या काळात या शेअर बाजाराने स्वत:चे स्थान निर्माण केले आहे. निफ्टी५० डेरिव्हेटिव्हचे व्यवहार ट्रेडिंग सिंगापूर एक्स्चेंज, शिकागो मर्कंटाइल एक्स्चेंज व ओसाका एक्स्चेंज येथेही केले जातात.

## एनएसईची वाटचाल

- भारतीय भांडवल बाजारात निफ्टी५०ची उलाढाल ६२ टक्के.
- निफ्टी५०मध्ये आयटी क्षेत्राचे १५.७ टक्के योगदान.
- सुरुवातीपासून निफ्टी५०ने वार्षिक सरासरी ११ टक्के उत्पन्न दिले आहे.
- निफ्टी५०चा वापर देशातील ईटीएफ मोठ्या प्रमाणावर करतात.

**निफ्टी निर्देशांकावरील विश्वास वाढतो आहे. त्यामुळे निफ्टी हा मुख्य ब्रँड म्हणून आगामी काळात विकसित होईल, यात शंका नाही.**

**-चित्रा रामकृष्ण, एमडी व सीईओ, एनएसई**